'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 1 Issue. 3
ISSN : 2348-7143 (Online)
July-Sept.-2014

# ज्ञानेश्वरीतील कार्याकार्यविवेक : एक आकलन
## (अध्याय १४, १५ व १६ च्या संदर्भात)

**प्रा. धनराज टी. धनगर**
**मराठी विभाग,**
**म. स. गा. महाविद्यालय, मालेगाव कॅम्प,**
**ता. मालेगाव, जि. नाशिक (महाराष्ट्र) भारत.**

***अध्यात्मामध्ये सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांनी मनुष्याची कृती नियंत्रित होत असल्याचे मानले जाते. माणसाची कृती ही त्याच्या सुख दु:खास जबाबदार धरली जाते. माणसाच्या कृतीवरुनच त्याचे श्रेष्ठ-कनिष्ठत्व ठरते, म्हणूनच प्रत्येक कृतीच्या पाठीशी विवेकाची भावना असणे महत्त्वाचे मानले जाते. हा विवेक शास्त्राधारित असावा असेही म्हटले जाते. किंबहूना शास्त्राधारित कृतीच विवेकी म्हटली पाहिजे. या अनुषंगाने ज्ञानेश्वरीच्या १४, १५ व १६ व्या अध्यायातील विवेचन समाजाचे उद्‌बोधन करणारे आढळते.***

**ज्ञानेश्वरीतील चौदावा अध्याय** हा गुणातीत योग म्हणून संबोधला जातो. चौदाव्या अध्यायामध्ये सत्व, रज, तम या तीन गुणांसंबंधी वर्णन आलेले आहे. त्याअनुषंगाने गुणातीत पुरुषाची लक्षणे आलेली आहेत. प्रकृतीपासूनच सत्त्व, रज, तम या तीन गुणांची निर्मिती होत असते. या तीन गुणांमुळेच सुख आणि दु:ख निर्माण होत असते. त्यातील सत्त्व हा गुण चांगल्या कृतीला प्रोत्साहन देणारा, चांगले सृजन करणारा, प्रकाशरुप असून सुख ज्ञान देणारा आहे. रजोगुण हा मनाचे रुजन करणारा असून तो वासनादी विकार उत्पन्न करणारा आहे. कर्मफळाची आसक्ती निर्माण करणारा आहे. तर तमोगुण हा अहंकार, मोह, आळस, इत्यादींना जन्म देणारा आहे. या तीनही गुणांनी माणूस संसाररुपी बंधनात अडकत जातो. यातूनच दु:खाची निर्मिती होते. या सुख दु:खातून सुटण्यासाठी या गुणांचे कार्य परमेश्वरांचे आहे असे समजणे म्हणजे गुणातीत होणे होय. सात्त्विक कर्माचे सात्विक फळ मिळते. रजोगुणी कर्माचे फळ दु:ख स्वरुप असते. व तमोगुणातून अज्ञान वाढत जाते. गुणातीत पुरुष हा गुणाला प्रवृत्त करत नाही किंवा गुणापासून निवृत्तही होत नाही तर तो साक्षी होऊन राहतो. अशा प्रकारचे विवेचन या अध्यायात आलेले दिसते.

सत्त्व, रज, तम ही एक भावनिक मानसिक अवस्था आहे. ती माणसाला चांगली वाईट कृती करण्यास प्रवृत्त करत असते. सात्त्विक विचार म्हणजे चांगले विचार, राजसिक विचार हे उपभोगवादी विचार असतात तर तामसिक विचार हे इतरांची पिळवणूक, शोषण करण्याला प्रोत्साहन देणारे विचार असल्याचे आपणास म्हणता येते. सत्त्व, रज, तम इ. गुण संस्कारांनी सिध्द होत असतात. माणूस जन्माला आल्यापासून तर आपल्या मृत्युपर्यंत

आपल्या आजूबाजूच्या वातावरणात संस्कारीत होत असतो. त्याचप्रमाणे चांगल्या पुस्तकांचे वाचन केल्यानेही चांगले संस्कार जोपासले जातात. शुध्द सात्त्विक आहारातूनही चांगल्या गुणांना उत्तेजनाच मिळते. तसेच चांगली शरीर प्रकृतीही तयार होत असते. चांगली प्रकृती, चांगले विचार, चांगली प्रवृत्ती यातून होणारे सृजन हेदेखील चांगलेच होत असते. दुसऱ्याचे दु:ख पाहून दु:खी होणे ही झाली प्रकृती आणि त्या दु:खामध्ये सहभागी होऊन ते कमी करण्याचा प्रयत्न करणे हे झाले संस्कार किंवा संस्कृती, याविरुद्ध केवळ दुसऱ्याला दु:ख देण्याचाच विचार करणे ही विकृतीच ठरते. या अनुषंगाने सत्त्व हा उत्तम गुण, रज हा मध्यम गुण आणि तम हा कनिष्ठ गुण ठरतो. या संदर्भात ज्ञानेश्वर म्हणतात,

**"तरी सत्त्व रज तम । तिघांसी हे नाम ।**
**आणि प्रकृति जन्म । भूमिका यया ।।**
**येथ सत्व ते उत्तम । रज ते मध्यम ।**
**तिहीमाजी तम । सवियाधारे ।।"**[६१]

सत्व, रज, तम या गुणांचे वर्णन केल्यावर या गुणांनी माणसाने बाधित होऊ नये म्हणून गुणातीत होण्याचा जो विचार आहे तो मात्र वास्तवाला धरुन होऊ शकत नाही. फार तर तमोगुण, रजोगुणांचा त्याग करुन सात्त्विक गुणांची जोपासना करण्याचा संदेश जास्त सांयुक्तिक ठरेल असे वाटते. कारण तिन्ही गुण टाकून गुणातीत होणे हेदेखील समुह-स्वास्थ्यासाठी हानीकारक ठरु शकते. कोणताही गुण नसलेली व्यक्ती ही वेडीच असू शकते. एखादा व्यक्ती किंवा समाजसमूह संकटात सापडलेला असताना एखाद्याचे निर्विकार राहणे हेदेखील विकृत पणाचे लक्षणच म्हटले पाहिजे.

**पंधरावा अध्याय** हा 'पुरुषोत्तम योग' म्हणून संबोधला जातो. चौदाव्या अध्यायाच्या शेवटी गुणातीत होण्यासाठी आत्मज्ञान होणे आवश्यक आहे. असे सांगितले आहे. या आत्मज्ञानासाठी वैराग्यवृत्तीची आवश्यकता पंधराव्या अध्यायात वर्णिलेली आहे. आसक्ती, मोह, अविवेक यांचा त्याग करण्याचा व निष्काम होऊन दु:खापासून मुक्त होण्याचा संदेश पंधराव्या अध्यायात आलेला दिसतो. ज्ञानेश्वर म्हणतात,

**"आता अन्यथा ज्ञानी । या दोनी अवस्था जया जनी ।**
**तया हरपती घनी । अज्ञानतत्वी ।।**
**ते अज्ञान ज्ञानी बुडालिया । ज्ञाने कीर्तिमुखत्व केलिया ।**
**जैसा वन्ही काष्ठ जाळूनिया । स्वयें जळें ।**
**तैसे अज्ञान ज्ञाने नेले । आपणही वस्तु देऊनि गेले ।**

**ऐसे जाणणेवीण उरले । जाणते जे ।।**

**ते तो गा उत्तमपुरुष । जो तृतीय कां निष्कर्ष ।**

**दोहींहून आणिक । मागिला जो ।।"**[६२]

ज्ञानाचे महत्त्व वादातीत आहे. स्वप्नातून जागे झाल्यावर वास्तवातील जगात येणाऱ्या माणसाला कल्पनेत राहून चालणार नाही तर त्याला सत्य स्वरुपाचे ज्ञान होणे आवश्यक आहे. येथील सुख, दु:ख, आनंद, कर्माची अपरिहार्यता जाणून घेणे आवश्यक आहे. कोणत्याही व्यक्तीला एकदा ज्ञान झाले की अज्ञान आपोआपच नाहीसे होत असते. ज्ञान प्राप्त झालेला पुरुषच उत्तम पुरुष ठरतो. जाणीव-जागृतीत जीवन जगणारा माणूसच आपली प्रगती साध्य करू शकतो. या अनुषंगाने उपरोक्त ओव्यांमधील विवेचन हे ज्ञानाचे महत्त्व प्रतिपादन करणारे, जाणीवेचे - जागृतीचे महत्त्व प्रतिपादन करणारे तसेच बुद्धिवादाला चालना देणारे, विवेकाला धरुन असलेले दिसते. उत्तम पुरूष या संकल्पनेत माणसाच्या आतील उत्तमतत्त्वांचा पुरस्कार केलेला असल्याने प्रस्तुत ओव्यांमधून मानवतावादाच्या छटाच दृष्यमान होत असल्याचे आपण म्हणू शकतो.

**सोळावा अध्याय** हा दैवासूरसंपद्वीभावयोग असलेला आढळतो. या अध्यायात दैवीसंपत्ती व आसुरीसंपत्ती या अनुषंगाने चर्चा आलेली आढळते. निर्भय होणे, चित्त शुध्द करणे, ज्ञान व योग यांची तत्परता, दान करणे, इंद्रिय निग्रह, यज्ञयाग, वेदशास्त्रादिकांचे अध्ययन व मनाची सरलता, कोणालाही काया, वाचा किंवा मनाने दु:ख न देणे, अक्रोध, निर्मोह वृत्ती, भूतदया, विषय अनासक्ती, अंत:करणाचा कोमलपणा, निंदकर्माविषयी सलज्जत्ता, चित्ताचे स्थैर्य, तेजस्वीपणा, क्षमाशीलता, अतिमानिता नसणे असे अठ्ठावीस गुण दैवीसंपत्तीच्या पुरुषाच्या ठिकाणी असतात. हे गुण स्पष्ट करतांना ज्ञानेश्वरांनी काही उदाहरणेही दिलेली आढळतात. उदा. अभय या गुणाच्या संदर्भात सांगतांना ज्ञानेश्वर म्हणतात,

**"आता तयाचि दैवगुणा । माजी धुरेचा बैसणा ।**

**बैसे तया आकर्णा । अभय ऐसे।।**

**तरी न घालूनि महापुरी । न घेपे बुडण्याची शियारी ।**

**कां रोग न गणिजे घरी । पथ्याचिया ।।**

**तैसा कर्माकर्माचिया मोहरा । उठूं नेदुनि अहंकारा ।**

**संसाराचा दरारा । सांडणे येणे ।।"**[६३]

उपरोक्त ओव्यांमधील दैवीसंपत्तीयोग या शब्दातील देव ही संकल्पना लौकिक जीवन वास्तवातील आढळून येत नाही. तथापि सत्कर्म हेच देवत्व ठरते या आशयाच्या अनुषंगाने सोळाव्या अध्यायातील दैवी

संपत्तीचे निरुपण आलेले दिसते. नैतिक मूल्यांच्या दृष्टीने सत्कर्माला चालना देणारे असेच यातील गुणांचे वर्णन असल्याचे आढळते. शिवाय या अनुषंगाने येणाऱ्या निरुपणात वास्तव जीवनातील उदाहरणे देऊन ज्ञानेश्वरांनी या गुणांचे महत्त्व पटवून दिलेले दिसते. उपरोक्त ओवीमधून अभय या गुणाबद्दल सांगताना ते म्हणतात, जसे पोहता येणाऱ्याला पुरात उडी टाकल्यावर बुडण्याची भीती राहत नाही किंवा पथ्य पाळणाऱ्याला रोगाची भीती राहत नाही त्याचप्रमाणे कर्म करत असतांना अंहकार येऊ न दिल्यामुळे संसाराची भीती नाहिसी होते. तसेच आज विविध आजारांचे प्रमाण वाढलेले असताना पथ्याचे महत्त्व सांगणाऱ्या ओव्या लोकांचे उद्‌बोधन करणाऱ्या अशाच म्हटल्या पाहिजेत. अहंकाराचा त्याग करणे ही बाबदेखील समाजसमूह स्वास्थ्यासाठी उपयुक्तच म्हटली पाहिजे. तथापि या ही अध्यायात वर्णाश्रमधर्माचा पुरस्कार केल्यामुळे मानवतावादाच्या अनुषंगाने मर्यादाच जाणवतात. ज्ञानेश्वर म्हणतात,

**"तरि ब्राम्हण करुनि धुरे । स्त्रियादिक पैल मेरे ।**
**माझारी अधिकारे । आपुलालेनि ।।**
**जया जे सर्वोत्तम । भजनीय देवताधर्म ।**
**ते तेणे यथागम । विधी यजिजे ।।**
**जैसा द्विज षट्कर्मे करी । शुद्र तयाते नमस्करी।**
**की दोहींसिही सरोवरी । निपजे याग ।।"६४**

अशाप्रकारे ब्राम्हणापासून सुरु करुन स्त्री-शूद्रापर्यंत ज्याला जसे आचरण सांगितले असेल तसे त्याने शास्त्रानुसार आचरण करावे असे सांगितलेले आढळते. असे विवेचन हे वर्णाश्रम धर्माचा पुरस्कार करणारे, भेदभेदाला चालना देणारेच ठरते. दोघांच्या वेगवेगळ्या कृतीचा लाभ दोघांना सारखाच होऊ शकत नाही. शिवाय चातुर्वर्ण्य असलेल्या काळात यामुळे शोषण झाल्याचेच आढळते. आज चातुर्वर्ण्य व्यवस्था अस्तित्वात नाही. प्रत्येकाला आपल्या आवडीनुसार स्वतंत्र व्यवसाय निवडण्याचा अधिकार आहे. उपरोक्त ओव्यांमध्ये लिहिलेले शास्त्र हेदेखील कालबाह्य झालेले आहे. अशा परिस्थितीत या ओव्या देखील कालबाह्यच ठरविल्या पाहिजे. विवेकाच्या पार्श्वभूमीवर विचार करता तसे करणेच समूहस्वास्थ्यवर्धक ठरू शकेल.

दैवी संपत्तीप्रमाणेच आसुरी संपत्तीच्या अनुषंगाने देखील विवेचन या अध्यायात आलेले दिसते. दिखाऊ धार्मिकता, गर्व, अहंकार, क्रोध, कठोर भाषण आणि अज्ञान ही सहा लक्षणे आसुरी प्रवृत्तीच्या माणसाची सांगितलेली आढळतात. ज्याप्रमाणे देवाचे अस्तित्व सिद्ध होत नाही मात्र देवत्व ही कृत्ती, वृत्ती, प्रवृत्ती ठरते, त्याचप्रमाणे आसुरांचे ही अस्तित्व सिद्ध होऊ शकलेले नाही. तथापि आसुरी ही देखील कृती, वृत्ती, प्रवृत्तीच

केवळ म्हटली पाहिजे. आसुरी प्रवृत्ती असणाऱ्या माणसाची सांगितलेली उपरोक्त लक्षणे किंवा गुण अनैतिकतेची द्योतकच असलेले आपण म्हणू शकतो. समाजामध्ये अनागोंदी वाढवणारी हिंसा, व्यभिचार, अशांती निर्माण करणारी, विकासाला खिळ लावणारी वृत्ती, प्रवृत्ती आणि त्यानुसार घडणारी कृती म्हणजेच आसुरी वृत्ती, प्रवृत्ती, कृती आपणास दिसते. अतिशय कुसंस्कारी, समाजाला हानी पोहचवणारी ही आसुरी संपत्ती असल्याने तिचा त्याग केला पाहिजे. संत ज्ञानेश्वर म्हणतात,

**"हा ठायवरी घोरी । संपत्ती ते आसुरी**
**अधोगती अवधारी । जोडिली तिही ।।"[६५]**

**किंवा**

**"परि काम क्रोध लोभ । या तिहींचेही थोंब ।**
**थांवे तेथे अशुभ । पिकले जाण ।।"[६६]**

काम, क्रोध, लोभ यामुळे आपण आपला विवेक हरवून बसतो. अतिकामवासनेच्या आहारी गेल्यामुळे शारिरीक आणि मानसिक स्वास्थ नाहीसे होते. क्रोधामुळे रकतदाब वाढतो. त्याचा विपरीत परिणाम शरीरावर होतो. लोभ हा तर वाईटच, लोभामुळे माणूस वाईट मार्गाला जातो. अतिशय चांगल्या पगाराच्या नोकऱ्या असतांना देखील लाच घेतल्याशिवाय कामे न करणाऱ्या अधिकारी, नोकर यांच्यामुळे सर्वसामान्यांना त्रास होत असतो. शेवटी लाच-लुचपत अधिकाऱ्यांच्या जाळ्यात सापडल्यावर नोकरीही गमवावी लागते. शिवाय समाजात मानहानी होती ती वेगळीच. म्हणून लोभ हा वाईटच म्हटला पाहिजे. लोभामुळे व्यक्तीचे वैयक्तीक अथवा समाजाचेही नुकसानच होते. कुठल्याही गोष्टीच्या अतिलोभामुळे दु:खच पदरात पडते. म्हणून माणसाने विवेकाने वागले पाहिजे. संत ज्ञानेश्वर म्हणतात,

**"कार्याकार्यविवेकी । शास्त्रेचि करावी पारखी ।**
**अकृत्य ते कुडे लोकी । वाळावे गा ।।**
**मग कृत्यपणे खरे निगे। ते तुवा आपेलेनि आंगे ।**
**आचरोनि आदरे चांगे । सारावे गा ।।**
**जे विश्वप्रामाण्याची मुदी । आजि तुझ्या हाती असे सुबुध्दी ।**
**लोकसंग्रहासि विशुध्दी । योग्य होसी ।।"[६७]**

उपरोक्त ओव्यामधील कार्याकार्यविवेक हा केव्हाही महत्त्वाचाच म्हटला पाहिजे. त्यासाठी शास्त्राचा आधार घेणेदेखील महत्त्वाचे ठरते. परंतु शास्त्र म्हणजे धर्मशास्त्र असा अर्थ ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असलेला दिसतो.

तथापि शास्त्र म्हणजे विज्ञान आणि विज्ञानाचाच आधार कार्यकार्यविवेक करताना घेतला गेला पाहिजे. विज्ञानाला केंद्रवर्ती ठेवूनच समुहकल्याणासाठी, मानवकल्याणासाठी आवश्यक असणारी कृती केली गेली पाहिजे. याउलट समुहस्वास्थासाठी घातक, मानवी अस्तित्त्वासाठी घातक, प्रगतीला खीळ लावणारी, विकासाचा आड येणारी कृती टाळणे व त्यासाठी आधुनिक विज्ञानाचा आधार घेणे हेच बुद्धिवादाला, विवेकाला व नीतीला धरुन ठरेल. आणि हेच उपरोक्त ओवीत सांगितल्याप्रमाणे विश्वप्रामाण्यवादी म्हणता येईल. असेच वर्तन सुबुध्दीयुक्त म्हणता येईल. लोकसंग्रहासाठी व लोककल्याणासाठीची विशुध्द भूमिकाही यालाच म्हणता येईल.

**संदर्भ :-**

१. संत ज्ञानेश्वर - ज्ञानेश्वरी अध्याय १४, ओवी क्र. १३८ ते १३९
२. संत ज्ञानेश्वर - ज्ञानेश्वरी अध्याय १५, ओवी क्र. ५२६ ते ५२९
३. संत ज्ञानेश्वर - ज्ञानेश्वरी अध्याय १६, ओवी क्र. ६८ ते ७०
४. तत्रैव - ओवी क्र. ९४ ते ९६
५. तत्रैव - ओवी क्र. ४१४
६. तत्रैव - ओवी क्र. ४२५
७. तत्रैव - ओवी क्र. ४६६ ते ४६८

RESEARCH JOURNEY